गोदातीर दि. 17.7.25

# शालेय विद्यार्थ्यांना सायबर जनजागृती, क्यूआर कोडचे वाटप



**नांदेड (प्रतिनिधी)-** नांदेड जिल्हा पोलीस दलाकडून शालेय विद्यार्थ्यांमध्ये सायबर जनजागृती करण्यात आली. तसेच क्यूआर कोडचे वाटप करण्यात आले.

या संदर्भात सोशल मीडियाचा वापर, वाहतूक सुरक्षा, सेल्फ डिफेन्स, कायदेविषयक जनजागृती (शस्त्र अधिनियम, ईव्ह टीजिंग रॅगिंग), गुड टच, बॅड टचबाबत माहिती, अंमली पदार्थाचे दुष्परिणाम, नैतिकता ई. तसेच मिशन समाधान-मध्ये महिलांच्या व विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी क्यूआर कोड आधारित तक्रार नोंदणी सुविधा, याविषयी मार्गदर्शन व प्रशिक्षण सत्र असे नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे उद्दीष्ट निश्चित केले आहे.

या मार्गदर्शन सत्रात शहरातील सर्व कोचिंग इन्स्टीट्यूट आणि क्लासेसमधील जवळपास ५० हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याचे उद्दीष्ट आहे. तसेच विशेषतः ग्रॅज्युएशन आणि पोस्ट ग्रॅज्युएशनच्या १० हजार मुली व विद्यार्थी तसेच शाळा व महाविद्यालयीन २० हजार विद्यार्थी व दीड हजार शिक्षक यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

विशेष प्रशिक्षण सत्रे जवळपास ५ हजार मुली व लहान मुले यांना सेल्फ डिफेन्स संरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. विशेष लैंगिक अत्याचाराचे गुन्ह्याचा तपास वेळीच पूर्ण करण्यासाठी २ हजार पोलीस व सरकारी वकील यांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. पालक व कुटुंबासाठी देखील सत्र आयोजित करण्यात येणार असून, यामध्ये जवळपास ५०० कुटुंब सदस्यांचा सहभाग नोंदविण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रथम टप्प्यात थेट लाभार्थी ९० हजार ते १ लाखांच्या जवळपास असतील, दुसरा टप्पा हा ग्रामीण भागात आयोजित करण्याचे ठरविले आहे.

सदरचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल व्हांवा या उद्देशाने आपण नांदेड जिल्हा पोलीस दलाकडून शाळा/कॉलेजमध्ये जावून जनजागृती करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

बुधवार, दि. १६ जुलै रोजी एमजीएम कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स, नांदेड येथे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, सपोनि दयानंद पाटील, पोलीस उपनिरीक्षक मारोती चव्हाण, अंमलदार काशीनाथ कारखेडे यांनी अंमली पदार्थाचे दुष्परिणाम, नैतिकता, वाहतूक सुरक्षा, सेल्फ डिफेन्स, कायदे विषयक जनजागृती (शस्त्र अधिनियम, ईव्ह टीजिंग रॅगिंग), गुड टच, बॅड टच, तसेच सायबर जनजागृती, सोशल मीडियाचा वापर या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच ऑनलाईन कंप्लेटकरिता क्यूआर कोडचे वाटप देखील करण्यात आले आहे.